बुधवार, दि २१ मे २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ३५ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# पाकची मस्ती उतरविण्याची धमक भारतीय सैन्य दलात - आमदार लोणीकर

## मंठा येथे सैन्याच्या पराक्रमाच्या समर्थनार्थ तिरंगा रॅली संपन्न



**मंठा । प्रतिनिधी -** पहलगाम हल्ल्यात २८ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारत सरकारने आक्रमक भूमिका घेतली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील या हल्ल्याला चोख उत्तर दिले जाईल असे इशारा पाकिस्तानला दिला होता. भारताने अखेर पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदल घेतला आहे. पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळ उद्धवस्त केले. भारताने पहलगामचा बदला घेण्यासाठी पाकिस्तानच्या ९ दहशतवादी तळांवर वायुसेने द्वारे हल्ला करून सडेतोड उत्तर देत जोरदार हल्ला चढवून प्रत्युत्तर दिले आहे यामध्ये १०० पेक्षा अधिक दहशतवाद्यांचा खात्मा देखील केला आहे. त्यांचा खात्मा करणाऱ्या भारतीय सैन्य दलाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

थेट एअर स्ट्राइकच्या माध्यमातून पाकिस्तानवर हल्ला चढवण्यात आला याला ऑपरेशन सिंदूर असे नाव देण्यात आले. हे तिन्ही सैन्य दलांच जॉइंट ऑपरेशन होतं. कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर वोमिका सिंग यांच्या नेतृत्वात भारताच्या पराक्रमी सैन्याने पाकिस्तानातील ४ आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ५ तळांना टार्गेट केलं. भारताची गुप्तचर यंत्रणा रॉ ने सर्व टार्गेटस निवडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.यापुढे देखील पाकिस्तानने निरपराध भारतीयांची हत्या करण्याची पातक केल्यास त्याला पाकिस्तानात घुसून सडेतोड उत्तर देण्याची ताकद भारतीय सैन्य दलामध्ये आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले. प्रसंगी भारत माता की जय वंदे मातरम छत्रपती शिवाजी महाराज की जय जय भवानी जय शिवाजी जय हिंद च्या घोषणांनी मंठा शहर दणाणून गेले होते.

भारतीय सैन्याचे मनोबल वाढावे यासाठी देशभरात देशभक्त नागरिकांच्या वतीने सैन्याच्या समर्थनार्थ तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत त्याचाच भाग म्हणून मंठा शहरामध्ये शासकीय विश्रामगृह रेस्ट हाऊस पासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत तिरंगा यात्रा काढण्यात आली. या तिरंगा यात्रेमध्ये राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक देशभक्त नागरिक सहभागी झाले होते. यावेळी देशासाठी सैन्य दलात काम करणाऱ्या आजी-माजी सैनिकांचा सत्कार देखील करण्यात आला. वंदे मातरम भारत माता की जय अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. यावेळी जालना शहरातील वातावरण देशभक्तीमय झाले होते.

यामध्ये बहावलपूर, मुरिदके, गुलपूर, लष्कर कॅम्प सवाई, बिलाल कॅम्प, कोटली, बरणाला, सरजाल कॅम्प, सियालकोट जवळ मेहमुना कॅम्प या दहशतवादी तळांचा समावेश होता. भारतीय सेनेच्या वतीने उद्ध्वस्त करण्यात आलेल्या ठिकाणांमध्ये जैश ए मोहम्मद या अतिरेकी संघटनेचे मुख्यालय, लष्कर ए तोयबा दहशतवादी संघटनेचा अड्डा, यासह हिजबुल मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेच्या प्रशिक्षण स्थळाचा समावेश होता. तर बहावलपुर हे आंतरराष्ट्रीय सीमेपासून जवळपास १०० किलोमीटर अंतरावर आहे आणि हे सर्व दहशतवादी अड्डे भारतीय सैन्य दलाच्या कारवाईत उद्ध्वस्त झाले आहेत ही भारताची खरी ताकद आहे ही बाब संपूर्ण जगाच्या लक्षात आली आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

भारतीय सैन्य जगभरातील प्रगत राष्ट्रांच्या सैन्याच्या बरोबरीचे व शस्त्रास्त्रदृष्ट्या प्रचंड ताकतीचे आहे. तत्कालीन पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात शास्त्रज्ञ असणारे भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली भारत संरक्षण क्षेत्रात प्रगत झाला असून भारताकडे अत्याधुनिक स्वरूपाचा प्रचंड मोठा शस्त्रसाठा आज उपलब्ध आहे अशा परिस्थितीत पाकिस्तानने कुठल्याही परिस्थितीत भारताला आणखी त्रास देण्याचा किंवा कुठलाही भ्याड हल्ला करण्याचा प्रयत्न केल्यास भारत सडेतोड उत्तर देण्यास सक्षम आहे. यापुढे पाकिस्तानने कुठलाही आगाऊपणा केल्यास भारत पाकिस्तानला पूर्णपणे नेस्तनाबूत करण्याची ताकद ठेवतो हे बाब आंतरराष्ट्रीय स्तरावर निदर्शनास आली आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

यावेळी माजी सैनिक परमेश्वर खराबे, शिवाजीराव गडदे सुरेश मोरे यांच्यासह गणेशराव खवणे अंकुशराव आवचर, बाबाराव शहाणे, संदीप भैय्या गोरे पंजाबराव बोराडे नितीन राठोड वैजनाथ बोराडे कैलास बोराडे विक्रम उफाड विलास घोडके अजय अवचार विठ्ठलराव काळे दीपक बोराडे नागेश घारे गणेश चव्हाल नितीन सरकटे आनंद जाधव पांडुरंग काळे भागवत पोटे भगवान देशमुख सुभाषराव बागल मुस्तफा पठाण निवास देशमुख दिगंबर आवचार प्रकाशराव मुळे रहीम शेख समंदर पठाण एजाज भाई शरद मोरे कयूम कुरेशी शबाब कुरेशी बाज खा पठाण शागीर खान कबीर तांबोळी माऊली गोंडगे, शेषनारायण दवणे किशोर हनवते शरद सरकटे माऊली गोंडगे वसंत बागल प्रसाद बोराडे अमोल मोरे राजेभाऊ खराबे संजय गायकवाड, रामकिसन बोडखे तौफिक कुरेशी कपिल तिवारी सचिन वाघमारे पांडुरंग शेंडगे विनोद राठोड मनोज देशमुख श्याम पवार, उध्दव मोरे, संतोष बोराडे राजेभाऊ डेंगळे तानाजी शेंडगे सोनाजी जाधव नारायण कणसे बाबाजी जाधव अशोकअप्पा सोनटक्के परमेश्वर शिंदे द्वारकादास चिंचाने सोपानराव वायाळ सोपानराव खरात अरुण खवणे विकास सूर्यवंशी अभिजीत कोदंडे नंदू टकले जेके कुरेशी इरफान हाजी सादिक बागवान सिद्दिकी बागवान ताहेर कृष्णा जाधव यमुनाताई दवणे जयश्री पवार आरती देशमुख बागवान सर्व जातीधर्माचे लोक विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# महात्मा गांधी रोड ते रेल्वे स्टेशन सिमेंट रस्त्यावर विद्युत पोल हटवा

## माजी नगरसेविका सौ संध्या देठे यांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** महात्मा गांधी चौक ते रेल्वे स्टेशन रोड नवीन अर्धवट सिमेंट रस्त्या झाल्यामुळे वाहतूक वाढली आहे मध्येच विद्युत पोल उभे असल्याकारणाने अपघात घडून अनेक लोकं जखमी होत आहे व काही जण मृत्यू सुद्धा पावले आहे. या रस्त्यामध्ये आलेले विद्युत पोली हटवून दिशादर्शक झेब्रा क्रॉसिंग रंगीत पट्टे मारावे अशी मागणी भाजपाच्या महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष माजी नगरसेविका सौ. संध्या संजय देठे यांनी शहर मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांची भेट घेऊन केली आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महात्मा गांधी चौक ते रेल्वे स्टेशन रोडवरील सिमेंट रोड हा अर्धवट अवस्थेत असून तो पूर्ण करणे व त्यावर रंगीत दिशादर्शक रेडियम पट्टे व झेब्रा क्रॉसिंग पट्टे लावण्यात यावे तसेच रोडच्या मधोमध डिव्हायडर लाईनला स्टडलाईट बसविण्यात यावे, त्यामुळे वाहतूक सुरळीत होईल व नेहेमी होणारे अपघात टाळता येतील. तात्काळ प्रशासकीय कारवाई करून काम पूर्ण करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन आयुक्त संतोष खांडेकर यांना सौ. देठे यांनी दिले आहे.

प्रसंगी अर्धवट असलेला सिमेंट रस्ता पोल शिफ्टिंग निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच अर्धवट सिमेंट रस्ता पोल शिफ्टिंग कामाला सुरुवात होईल दिशादर्शक रेडियम पट्टे झेब्रा क्रॉसिंग कामासाठी लवकरच सार्वजनिक बांधकाम विभाग महानगरपालिकेमार्फत हे काम करण्यात येणार असल्याचे आश्वासन आयुक्त संतोष खांडेकर यांनी दिल्याचे सौ. संध्या देठे यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.

# महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाकडून राज्यात एक लाख कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता

**मुंबई -** महाराष्ट्राच्या राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत उद्योग विभागातील धोरण कालावधी संपुष्टात आल्यामुळे प्रलंबित असलेल्या ३२५ प्रस्तावांना आज मंत्रिमंडळाच्या मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या प्रस्तावांना मंजुरी दिल्यामुळे १,००,६५५.९६ कोटी रूपयांची गुंतवणूक आणि ९३,३१७ रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

उद्योग विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ आणि त्याअंतर्गत फॅब प्रकल्पाकरिता प्रोत्साहने, महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण २०१८, रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स ण्ड ज्वेलरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरिता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले धोरण २०१८, महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण २०१९ या धोरणांचा कालावधी संपुष्टात आलेला आहे. सदर विषयांचे नवीन धोरण ठरविण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. मात्र धोरणाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्राप्त झालेल्या विविध घटकांच्या प्रस्तावापैकी राज्याच्या विकासाच्या दृष्टीने फायदेशीर ठरतील अशा घटकांना प्रोत्साहने मंजूर करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. वरील धोरणांचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे नवीन धोरण लागू होईपर्यंत संबंधित धोरणानुसार प्रलंबित प्रस्तावांना मान्यता दिल्यास उद्योग घटकांना गुंतवणूक करणे, उद्योग घटकांना अनुदान देणे शक्य होणार आहे. यानुसार महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ आणि त्याअंतर्गत फॅब प्रकल्पाकरिता प्रोत्साहने धोरणाच्या अधीन राहून ३१३ प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. ३१३ प्रस्तावांमधून ४२,९२५.९६ कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून ४३,२४२ रोजगार निर्मिती होणार आहे.

महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण २०१८ नुसार एकूण १० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या १० प्रस्तावांमधून ५६,७३० कोटी **पान ३ वर**

# संपादकीय

## बहुविध प्रतिभेचे धनी काळाच्या पडद्याआड

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे काल म्हणजे २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. डॉ जयंत नारळीकर यांना भावपूर्ण श्रद्धाजली !

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# सिंदूर पुसणाऱ्या घटनादुरुस्तीचे काय करणार?

१८ जून १९५१ हा दिवस शेतकऱ्यांना पुन्हा गुलामीत ढकलणारा ठरला. त्या दिवशी झालेल्या पहिल्या घटना दुरुस्तीचे जेवढे देशाचे नुकसान केले तेवढे दुसऱ्या कोणत्याच आपत्तीने वा युद्धाने केले नाही. पाच लाख शेतकरी बायांचे सिंदूर ध्वस्त करणारी ही तारीख आहे. त्याबाबत सत्ताधाऱ्यांचे क्रूर मौन आहे!

**शेतकऱ्यांचे योगदान**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. हे स्वातंत्र्य मिळवून देण्यात भारतीय शेतकऱ्यांचे मोलाचे योगदान होते. महात्मा गांधी येईपर्यंत झालेल्या एकाही लढ्यात शेतकऱ्यांचा सहभाग नव्हता. अभिजन किंवा सैनिक लढले होते. गांधीजी भारतात आले आणि त्यांनी पहिला सत्याग्रह चंपारण (बिहार) येथे केला. त्या सत्याग्रहात जसे पहिल्यांदा शेतकरी सहभागी झाले, तश्याच स्त्रियाही पहिल्यांदा लढ्यात उतरल्या. शेतकरी आणि स्त्रिया म गांधी यांच्या पाठीशी उभे राहिले म्हणून म गांधी लोकनायक म्हणून ओळखले जाऊ लागले. शेतकरी आणि स्त्रिया हे सर्जक आंदोलनात आल्यामुळे देशाच्या स्वातंत्र्याचा लढा शांततापूर्ण, अहिंसक आणि प्रभावी राहिला. चंपारण पाठोपाठ गुजरात मधील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखालील आंदोलन देखील शेतकऱ्यांचेच होते. या आंदोलनांमुळे भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन जनआंदोलन झाले, हा इतिहास अगदी अलीकडचा आहे. परंतु दुर्दैवाने स्वातंत्र्य आंदोलनात शेतकऱ्यांच्या भूमिकेवर फारसा प्रकाश कोणी टाकत नाही.

**सांप्रदायिक आणि दावे**

१५ ऑगस्ट १९४७चा सूर्य शेतकऱ्यांच्या तळहातावर उगवला होता. या स्वतंत्र देशाची पहिली घटना लिहिली जात होती तेंव्हा पहिल्यांदा खळखळ सुरू झाली. काही लोकांना हा देश एका धर्माचा करायचा होता, त्यांनी डोके वर काढण्याचा प्रयत्न केला, पण तो प्रयत्न नाकाम झाला. तसाच एक प्रयन जमिनीचे राष्ट्रीयकरण करा म्हणणाऱ्यांनी केला. पण तो प्रयत्नही राजाजी (राज गोपालाचारी) सारख्या नेत्यांनी हाणून पाडला. तथाकथित धर्मवादी व डावे या दोघांनी शेतकऱ्यांच्या हितसंबंधाला नख लावायचा प्रयत्न घटना तयार करताना केला होता पण त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाही. तेंव्हा पासून ही मंडळी डूख धरून आहे.

**मूळ संविधान**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झालेल्या देशात २६ जानेवारी १९५० रोजी पाहिले संविधान लागू झाले. त्या पूर्वी या देशात पाचशे हुन अधिक संस्थाने होती. त्यांना घटना नव्हती. मनमाणेल तसा कारभार करायचे! भारताला पाहिले संविधान २६ जानेवारी १९५० रोजी मिळाले. या संविधानात शेतकऱ्यांच्या प्रती कोणताही पक्षपात केला गेला नव्हता. भारताच्या मूळ घटनेत खाजगी मालमत्तेचा अधिकार मूलभूत अधिकार म्हणून मानलेला होता (आणीबाणीत तो रद्द मुलभूत अधिकाराच्या यादीतून हटविण्यात आला). अनुच्छेद १३ नुसार मूलभूत अधिकारांचा विरोध किंवा संकोच करता येणार नाही, अशी तजवीज करण्यात आली होती. (हे मूलभूत अधिकारांचे कवच देखील रद्द करण्यात आले) आपल्या मूळ घटनेत फक्त आठ परिशिष्ट होती. अवघ्या दीडच वर्षात पहिली घटना दुरुस्ती करण्यात आली व ९वे परिशिष्ट जोडण्यात आले. अनुच्छेद ३१ ए व बी मध्ये दुरुस्ती केली की या परिशिष्टात जे कायदे टाकले जातील त्या विरुद्ध टायालयात जाता येणार नाही. या दुरुस्तीमुळे भारतीय शेतकऱ्यांच्या गुलामीची पुन्हा सुरुवात झाली.

**आसुरी आरंभ**

१८ जून १९५० रोजी पहिल्या घटना दुरुस्तीने संविधानात एक नवे परिशिष्ट जोडण्यात आले. व या परिशिष्टात टाकलेल्या कायद्यांच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही, भले तो कायदा मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करीत असेल, अशी तजवीज करण्यात आली. आज या परिशिष्टात २८४ कायदे आहेत त्या पैकी २५० कायदे हे शेतकरी किंवा शेतीशी संबंधित आहेत! २८४ पैकी २५० कायदे केवळ शेती व शेतकऱ्यांशी संबंधित असणे हा योगायोग असू शकत नाही. परिशिष्ट ९ हे विषारी सापांचे वारूळ आहे. ते संविधानात टाकल्यामुळे शेतकरीविरोधी कायदे दीकुं राहिले.

**दुरुस्ती नव्हे बिघाड**

शेतकऱ्यांना 'न्यायबंदी' करणाऱ्या या घटना दुरुस्तीला दुरुस्ती म्हणावी की घटना बिघाड म्हणावे हे तुम्हीच ठरवा. हा प्रकार झाला तेंव्हा हंगामी सरकार होते. तोपर्यंत पहिली निवडणूक झाली नव्हती. प्रौढ मतदानावर आधारित पहिली निवडणूक अवघ्या सहा महिन्याने होणार होती. सहा महिने थांबल्याने आकाश कोसळणारे नव्हते. होय, या हंगामी संसदेला घटना दुरुस्ती करण्याचा कायदेशीर अधिकार होता पण नैतिक अधिकार होता का? अजिबात नाही. त्या काळातील अनेक गांधीवादी व स्वातंत्र्यतावादी नेत्यांनी थांबण्याचा सल्ला दिला होता. तर सांप्रदायिक व डाव्या पक्षांनी घटनादुरुस्तीचे समर्थन केले होते.

**एक चूक घोडचूक**

१८ जून १९५१ रोजी पहिला घटनाबिघाड झाला नसता तर १) कमाल शेतजमीन धारणा कायदा २) आवश्यक वस्तू कायदा ३) जमीन अधिग्रहण कायदा हे संविधानविरोधी, मूलभूत हक्कांचा संकोच करणारे कायदे इतकी वर्षे टिकलेच नसते. सीलिंग कायदा तर न्यायालयाने तेंव्हाच बेकायदा ठरवला होता, नंतर तो परिशिष्ट ९ मध्ये टाकला गेला. जमीन अधिग्रहणाबाबत ही तेच आहे. हे कायदे नसते तर शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळीच आली नसती.ज्या देशात पाच लाख शेतकरी कुटुंबातील बहिनींचे सिंदूर पुसले गेले पण ज्या देशातील सरकारला त्याची तमा नाही, अशा देशात आपण राहतो.

शेतकऱ्यांबाबत हा पक्ष चांगला किंवा तो पक्ष वाईट असे म्हणता येत नाही! सगळेच सारखे, सगळेच शेतकऱ्यांचे मारेकरी! काँग्रेस असो की भाजप दोघांचे हात शेतकऱ्यांच्या रक्ताने लाल झाले आहेत.

अशा परिस्थितीत आपण काय करू शकतो? मी ठरवले आहे की, शेतकरीविरोधी कायदे रद्द करा, परिशिष्ट-९ रद्द करा, या मागणीचे निवेदन प्रधानमंत्री यांना पाठवायचे, १८ जूनला काळी फीत लावायची. जेथे शेतकरी परतंत्र दिवसाचा कार्यक्रम होईल तेथे सहभागी व्हायचे!



एक सामान्य नागरिक, एक किसानपुत्र आजच्या परिस्थितीत दुसरे काय करू शकतो?

**अमर हबीब, आंबाजोगाई**
**किसानपुत्र आंदोलन**
**मो ८४११९०९९०९**

# उल्हास नदी बचाव समितीच्या आंदोलनाला यश,अनधिकृत भराव प्रकरणात दहा कोटीचा दंड

**बदलापूर । प्रतिनिधी -** उल्हास नदीमध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत भराव,संरक्षण भिंतीचे बांधकाम व नदीपात्रातील अतिक्रमण प्रकरणी उल्हास नदी बचाव समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.हेंद्रेपाडा येथील सत्संग विहार समितीने नदीपात्रातात अनधिकृतपणे भराव टाकण्याचे आणि संरक्षक भिंतीचे काम सुरु केले होते.या अतिक्रमणाची माहिती मिळताच उल्हास नदी बचाव समितीने महसूल,पोलिस आणि कुळगांव-बदलापूर नगरपरिषद प्रशासनासह संबधित अधिका-यांकडे तक्रारी दाखल केल्या होत्या.परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरीत कृती करत प्रशासनाने संबंधित काम थांबविले आणि आणि वापरात असलेल्या जेसीबी,पोकलेन मशिनरी सील केली होती.याप्रकरणी तहसीलदार मा.अमित पुरी यांनी ठोस कार्यवाही करत सत्संग विहार समितीवर १०कोटी १६लाख १७हजार १४१रुपयांचा दंड ठोठावला आहे.त्यांच्या या निर्णयाचे उल्हास नदी बचाव समितीने प्रशासनाचे मनःपूर्वक कौतुक करत मनस्वी आभार मानले आहेत.तसेच इलेक्ट्रॉनिक



मिडीया,प्रिंट मिडीया,युट्युब चॅनल व सर्व पत्रकार बंधु-भगिनी यांनी महत्वपूर्ण सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही उल्हास नदी बचाव समितीच्या वतीने धन्यवाद व आभार व्यक्त करण्यात आले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# जलसंधारण कामास अडथळा केल्यास मी तिथे समोर येईल- तहसीलदार विजय चव्हाण



**अंबड । प्रतिनिधी -** संदर्भात उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबड विजय चव्हाण यांच्या अध्यक्षतेत समस्त महाजन ट्रस्ट, मुंबई च्या श्रीमती नुतन देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत अंबड घनसावंगी तालुक्यात लोकसहभागातून सुरु असलेल्या पाणी टंचाई, दुष्काळ मुक्त करिता जलसंधारणाची कार्याला प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांची तहसील कार्यालयात बैठक घेण्यात आली. समस्त महाजन ट्रस्ट कडून विनामूल्य मिळालेल्या पोकलेन्ड मशीन द्वारे सुरु असलेल्या राष्ट्रीय कार्यासाठी मेहनत घेतलेल्या ग्रामस्थांची उपस्थिती होती. यावेळी ओमप्रकाश उत्बाळे, दिलीप लोहकरे, डॉ वाय बी कुलकर्णी आदी मंडळींनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीमती नुतन देसाई यांनी नाला, नदी, ओढ्या चे खोलीकरण आणि ताळ्यातील गाळ घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांचे कौतुक करुन अभिनंदन केले. तसेच पावसाळ्या पूर्वी जास्तीत जास्त गावात कामे सुरु करुन घेण्यासाठी तात्काळ मशीनची मागणी करावी असे आवाहन केले. याकार्यात प्रशासकीय यंत्रणा पूर्ण सहकार्य करेल, या राष्ट्रीय कार्याला कोणी अडथळा निर्णय करत असेल त्याठिकाणी मी स्वतः उभा राहन गती देईल असे तहसीलदार विजय चव्हाण यांनी उपस्थित शेतकऱ्यांना हिम्मत दिली. यावेळी नारायण देवकते, श्रीमंत शेळके, नरेंद्र जोगड, चंद्रकांत मुळे, अमर अवघड, जगदीश जोशी, महादेव मते, अरविंद नवरे, जगन बरडे, सुरेश दीडपोळे, बाल्मिक कवडे आदींची उपस्थिती होती. यावेळी देवा चित्राल यांनी सूत्रसंचालन करुन सुरू असलेल्या कामाचा प्रगती अहवाल सादर करुन शेवटी आभार मानले.

# संभाजी ब्रिगेड मंठाच्यावतीने ग्रामविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाच्या कारवाईची मागणी



**मंठा । प्रतिनिधी -** गावगाड्याच्या विकासात ग्राम विकास अधिकारी यांची अत्यंत महत्वाची भूमिका असते.ग्रामीण भागाच्या विकासात ग्राम विकास अधिकारी हा खऱ्या अर्थाने ग्रामविकासाचा कणा समजला जातो.ग्रामीण भागातील जनतेला मूलभूत शासकीय सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनाकडून त्याची नेमणूक केली जाते. एवढंच काय तर शासनाच्या परिपत्रकनुसार सर्व ग्राम विकास अधिकारी यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे.

मुख्यालयी राहत असल्याबाबत त्या त्या ग्राम पंचायत यांचे ठराव पंचायत समितीच्या सादर करणे अनिवार्य असताना संपूर्ण तालुक्यातील ग्राम विकास अधिकारी यांनी ग्रामसभेचे ठराव देऊन आम्ही गावातच कसे राहतोय या बाबतचे खोटे ठराव व पुरावे दाखल करून शासनाची व सर्व सामान्य जनतेच्या मेहनतीच्या पैसाचा या कामचुकार व मग्रूर असलेल्या अधिकाऱ्याकडून गैरवापर अपव्यय होत आहे.

यामुळे सर्व सामान्य गावखेड्यातील लोकांना त्रासाला समोर जावा लागत आहे.

यासाठी संभाजी ब्रिगेड मंठा च्या वतीने सर्व ग्राम विकास अधिकारी यांना त्यांनी सादर केलेल्या ठरावाची सत्य प्रत देण्याची मागणी करूनही देण्यात येत नसल्याने माहिती अधिकारात प्रोसिडिंग ची प्रत अवलोकनासाठी उपलब्ध करावी यासाठी पंचायत समिती कडून गट विकास अधिकारी यांनी वेळोवेळी सूचना, नोटीस, स्म रणपत्र देऊनही यासर्व नोटिसाना केराची टोपली दाखवणाऱ्या या सर्व ग्रामसेवक यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी.

त्याच बरोबर विस्तार अधिकारी यांना गावोगाव जाऊन ग्राम विकास अधिकारी हे मुख्यालयी राहतात की नाही, याबाबतची चौकशीचे आदेश देऊनही चौकशी न केल्याने त्यांना वारंवार सूचना,पत्र,कारणे दाखवा नोटीस देऊनही ते चौकशी करत नसल्याने यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई व्हावी.

या मागणीसाठी आज पंचायत समितीसमोर संभाजी ब्रिगेड मंठा च्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले.

## पान १ वरुन

### महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाकडून ...

रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून १५,०७५ रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. तर रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स ण्ड ज्वेलरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरिता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले धोरण २०१८ अनुसार २ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावांमधून १००० कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून ३५,००० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

**राज्य मंत्रिमंडळाचे इतर निर्णय**

कारंजा, जिल्हा वाशिम येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा निर्णय. यासाठी एकूण २८ पदनिर्मितीला तसेच १.७६ कोटींच्या खर्चाला मंजुरी (विधी व न्याय विभाग)

बायोमिथेनेशन तंत्रज्ञानाचा वापर करुन कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी मे. महानगर गॅस लिमिटेड यांना बृहन्मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देणार (नगरविकास विभाग)

राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर, 'माझे घर-माझे अधिकार' हे ब्रीद. ७० हजार कोटींची गुंतवणूक येणार, झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम (गृहनिर्माण विभाग)

सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजना, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या प्रकल्पाच्या ५३२९.४६ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. ५२,७२० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार (जलसंपदा विभाग)

अरुणा मध्यम प्रकल्पांतर्गत मौजे हेत, तालुका वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग या प्रकल्पासाठी २०२५.६४ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. ५३१० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार (जलसंपदा विभाग)

पोशिर प्रकल्प, तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला ६३९४.१३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग)

शिलार तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला ४८६९.७२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग)

# छावाच्या युवा प्रदेशाध्यक्षपदी प्रा. राजेश चव्हाण यांची निवड

**नांदेड । प्रतिनिधी -** छावा संघटनेच्या युवा प्रदेशाध्यक्षपदी. प्रा. राजेश चव्हाण यांची निवड करण्यात आली व तसेच लातूर जिल्ह्याच्या ग्राम ीण जिल्हाध्यक्षपदी विशाल देवने व लातूर जिल्हा अध्यक्षपदी उत्तम बिरादार यांचे निवड संघटनेचे अध्यक्ष राजेश मोरे यांच्या हस्ते संघटनेच्या विभागीय बैठकीत नांदेड येथे विश्रामगृह येथे करण्यात आली. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते अनिल पाटील, माधव मोरे, प्रशांत बिरादार, अजय बिरादार, नरसिंग बिरादार, महेश सूर्यवंशी, ओम कार मंगनाळे, शरद बिरादार, श्रीकांत मुळे, रामेश्वर मुळे, नरसिंग बिरादार खेरडा, बाळासाहेब निडवंचे, शंकर पाटील, व्यंकट शिंदे सर , लक्ष्मीकांत मुळे आदींची उपस्थिती होती.



या निवडीबद्दल लातूर जिल्ह्यात छावा संघटनेला पुन्हा त्याच जोमाने उभारी घेऊन गाव तेथे शाखा स्थापन करून शहर व गाव पातळीवरील कार्यकर्ते शेतकरी व इतर गरजूंना न्याय मिळवून देण्याचे काम करण्यात येईल असे निवड झालेले युवा प्रदेशाध्यक्ष राजेश चव्हाण यांनी म्हटले आहे.

# दिवसेंदिवस वाढत्या आगीच्या घटना चिंताजनक

देशात दिवसेंदिवस आगीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.यात काही नैसर्गिक तर काही मानवी चुकांमुळे आगीच्या घटना घडतांना दिसतात. तेलंगाणाची राजधानी हैदराबाद येथील ऐतिहासिक चारमिनारस्थित गुलजार हाऊसच्या एका इमारतीला दिनांक १८ मे २०२५ ला सकाळी भीषण आग लागली.या भीषण आगीत दुर्दैवाने ८ बालकांसह १७ जणांचा होरपळून व गुदमरून मृत्यू झाला ही भयावह घटना अंगावर शहारे येणारी आहे.ही घटना शॉटसर्किटमुळे झाल्याचे सांगितले जाते. ही आग चारमिनार या गजबजलेल्या परिसरातील एका इमारतीतील तळघरात अचानक आग लागली आणि बघता बघता आगीने रौद्ररूप धारण केले व आगीचे लोण वरच्या मजल्यावर पसरले आणि आगीने विक्राळ रूप धारण करू १७ लोकांचा बळी घेतला व अनेक जण जखमी झाले.याच दिवशी सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील सेंट्रल इंडस्ट्रीज या टॉवेल कारखान्याला रविवार १८ मे रोजी पहाटे ३.३० ते ४ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली व क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि अग्नितांडव सुरू झाले.यात ८ जणांचा होरपळून मृत्यू झाला व अनेक जण जखमी झाले.या दोन्ही घटनांमध्ये २५ नागरिकांचा मृत्यू झाला व अनेक जण जखमी झाले ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.परंतु आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.परंतु चारमिनार परिसरातील आग असो अथवा सोलापुरातील टॉवेल कारखान्याला लागलेली भीषण आग असो या दोन्ही आगीच्या घटना मानवी चुकांमुळे झाल्याचे दिसून येते.कारण शॉटसर्कीट का होते याचे मुख्य कारण म्हणजे इलेक्ट्रिक विभागाकडून ऑडिट न करने किंवा इलेक्ट्रिकची तपासणी न करता त्याकडे दुर्लक्ष केल्याने शॉटसर्कीटचे प्रकार राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वाढत आहे.म्हणजेच इलेक्ट्रिकच्या बाबतीत टेक्नीकल फॉल्टकडे दुर्लक्ष केल्याने अशा भयावह घटना नेहमीच घडत असतात व यामुळे जीवीत हाणी मोठ्या होत आहे.वाढती लोकसंख्या, शहरीकरण,औद्योगिकीकरण, गगनचुंबी इमारती,वातानुकूलित संयंत्र याठिकाणी आगीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.बदलते हवामान,वाढती लोकसंख्या,शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यांमुळे होणाऱ्या आगीच्या भयावह घटना पहाता स्थानिक प्रशासन, राज्य प्रशासन व केंद्र सरकारने या घटनांकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.कारण एक आगीची घटना करोडोंची वित्तीय हानी तर होतेच सोबतच मोठ्या प्रमाणात जीवित हानी सुध्दा होतांना आपण पहातो ही जीवीत हानी कदापि भरून काढता येत नाही.याकरीता देशातील संपूर्ण राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने अग्निशमन विभागाला सशक्त करून अत्याधुनिक यंत्र सामग्री ताबडतोब अग्निशमन विभागाला पुरविने अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे अग्निशमन विभागात मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची कमतरता दिसून येते त्याचीही पुर्तता सरकारने युध्दपातळीवर करने अत्यंत गरजेचे आहे. कारण मनुष्यबळा शिवाय कोणतेही काम शक्य नाही.त्याचप्रमाणे बदलत्या काळानुसार अत्याधुनिक यंत्रसामग्रीची नितांत गरज आहे आणि आगीच्या वाढत्या घटना पहाता औद्योगिक परिसरात आणि गर्दीच्या ठिकाणी अग्निशमन व्यवस्था सक्तीची करायला हवी.कारण राज्यात किंवा देशात छोट्या-मोठ्या आगीच्या घटना दररोज कुठे ना कुठे होतांना आपण पहातो आणि यामुळे मोठ्या प्रमाणात वित्तीय व जीवीत हाणी होत आहे ही अत्यंत गंभीर व संवेदनशील बाब आहे यावर राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे व आगीच्या घटना टाळण्यासाठी सर्वतोपरी उपाय योजना करण्याची नितांत गरज आहे.चारमिनार परिसरातील व सोलापूर इंडस्ट्रीज मधील आगीत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या प्रती श्रद्धांजली अर्पण करतो.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी ‘श्री महाधन्वन्तरि याग’ भावपूर्ण वातावरणात संपन्न!

**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी)** - ‘सांप्रत काळ समस्त जगासाठी अतिशय वाईट काळ म्हणजेच आपत्काळ आहे. युद्धाचे सावट डोक्यावर येऊन ठेपले आहे. या घनघोर आपत्काळात शत्रू केवळ शस्त्रास्त्रांनीच नव्हे, तर आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे रोगजंतूंच्या माध्यमातूनही आपल्यावर आक्रमण करू शकतो. या न पाहिलेल्या नवीन आपत्तींना तोंड देण्यासाठी सर्वांचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक बळ चांगले असणे आवश्यक आहे. ‘सर्वांचे कल्याण व्हावे’, या उद्देशाने या ‘श्री महाधन्वन्तरि यागा’चे प्रयोजन आहे. ‘लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु ।’ म्हणजे ‘सर्व लोक सुखी होवोत’, याउद्देशाने सनातन संस्था आयोजित ऐतिहासिक आरि भव्य अशा ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’च्या ठिकाणी ‘श्री महाधन्वन्तरि याग’ करण्यात आला. या वेळी देशविदेशातील २० हजारांहून अधिक साधक आणि हिंदू धर्मप्रेमींची उपस्थिती होती.


या महायागासाठी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्यासह त्यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ, श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ, गोव्याचे आरोग्यमंत्री श्री. विश्वजित राणे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी आमदार सौ. दिव्या विश्वजित राणे यांच्या अनेक संत-महंत, प्रतिष्ठित यांची विशेष उपस्थिती होती. पुरोहितांनी म्हटलेल्या मंत्रघोषामुळे संपूर्ण वातावरण भक्तीमय आणि चैतन्यमय झाले होते.

या संदर्भात सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक म्हणाले, ‘‘शिवागम विद्यानिधी आगमाचार्य श्री. अरुणकुमार गुरुमूर्ती आणि गुरुमूर्ती शिवाचार्य यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या यागात ६१ दांपत्य यजमान म्हणून सहभागी झाली होती. जेव्हा भगवंताचे हजारो भक्त आणि वेदब्राह्मण एकत्रित येऊन



यज्ञ करतात, तेव्हा तो यज्ञ ‘महायज्ञ’ बनतो. त्यामुळे या महोत्सवात हजारो भक्त, भाविक एकत्रित येऊन झालेला हा ‘धन्वन्तरि याग’ ‘श्री महाधन्वन्तरि याग’ बनला आहे. या यज्ञाचा संकल्प केवळ व्यष्टी किंवा कौटुंबिक या स्तरांवर मर्यादित नसून तो विश्वव्यापक संकल्प आहे.’’

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात चौघांना ‘हिंदु राष्ट्ररत्न’ व २० जणांना ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार!











**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी)** - सनातन संस्थेच्या वतीने आयोजित ‘सनातन राष्ट्र शंखनाद’ महोत्सवात हिंदु धर्मजागृती आणि राष्ट्ररक्षणासाठी कार्य करणार्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या शुभहस्ते हस्ते ४ जणांना ‘हिंदु राष्ट्ररत्न’, तर २० जणांना ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या वेळी कार्यक्रमाला २३ देशांतील २० हजारांहून अधिक साधक आणि हिंदू धर्मप्रेमी उपस्थित होते. या प्रसंगी व्यासपीठावर सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांची वंदनीय उपस्थिती होती.

या प्रसंगी सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस म्हणाले, देशात विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना ‘पद्म’ ‘पद्मभूषण’ आणि ‘पद्मविभूषण’ पुरस्कार दिले जातात; मात्र हिंदु धर्मासाठी जीवन समर्पित करून कार्य करणार्यांना अद्याप कोणताही सन्मान दिला जात नाही. ही पोकळी भरून काढण्यासाठी सनातन संस्थेने हा पुरस्कार आरंभला आहे. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी हे पुरस्कार दिले जातील.

उत्तरप्रदेश येथील आचार्य गणेश्वर शास्त्री द्रविड, बांगलादेश येथील ‘बांगलादेश मायनॉरिटी वॉच’चे संस्थापक पू. अधिवक्ता रवींद्र घोष, कर्नाटक येथील पंचशिल्पकार पू. काशीनाथ कवटेकर, महाराष्ट्रातील मुंबई येथील प्रख्यात प्रवचनकार डॉ. सच्चिदानंद शेवडे, यांना ‘हिंदु राष्ट्ररत्न’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तर ‘सनातन धर्मश्री’ पुरस्कार देऊन सन्मानित करणार्यांमध्ये भाग्यनगर येथील हिंदुत्वनिष्ठ आमदार टी. राजा सिंह, काशी-मथुरा येथील मंदिरमुक्तीसाठी लढा देणारे सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णु जैन, गोवा येथील घनपाठी आचार्य योगेश्वर बोरकर, गोवा येथील पंडित महामहोपाध्याय डॉ. देवदत्त पाटीलजी, कर्नाटक येथील श्रीराम सेनेचे संस्थापक श्री. प्रमोद मुतालिक, कर्नाटक येथील ‘युवा बिग्रेड’चे मार्गदर्शक श्री. चक्रवर्ती सुलीबेले, दिल्ली येथील चाणक्य फोरमचे संपादक मेजर गौरव आर्यजी, दिल्ली येथील ‘सुदर्शन वाहिनी’चे प्रधान संपादक डॉ. सुरेश चव्हाणके, उत्तर प्रदेश येथील ‘प्राच्यम्’चे संस्थापक कॅप्टन प्रवीण चतुर्वेदी, तामिळनाडू येथील हिंदू मक्कल कत्छी’चे संस्थापक श्री. अर्जुन संपथ, दिल्ली येथील ‘सेव कल्चर सेव भारत फाऊंडेशन’चे श्री. उदय माहुरकर, कर्नाटक येथील माजी अतिरिक्त महाअधिवक्ता अधिवक्ता अरुण श्यामजी, बेल्जियम येथील लेखक डॉ. कोएनराड एल्स्ट, ओडीसा येथील ‘इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट ण्ड कल्चरल हेरिटेज’चे श्री. अनिलकुमार धीर, दिल्ली येथील अग्नि समाजा’चे संस्थापक श्री. संजीव नेवर, दिल्ली येथील ‘सरयु ट्रस्ट’चे संस्थापक श्री. राहुण दिवाण, हरियाणा येथील विचारवंत श्री. नीरज अत्री, मुंबई येथील समाजसेवक तथा लेखक डॉ. अमित थडानी, इंडोनेशिया येथील ‘धर्मस्थापनम्’ फाऊंडेशनचे रस आचार्य पू. धर्मयशजी महाराज आणि छत्तीसगड येथील श्री. प्रबल प्रतापसिंग जुदेव यांचा समावेश आहे.

# कामगार विरोधी चार श्रमसंहिता रद्द करा

## सिटू संघटनेचे आंदोलन

**जालना । प्रतिनिधी** - जीसेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन सी टू च्या वतीने दिनांक २० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे व निदर्शने करण्यात आली. या निदर्शनात जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचारी आशा वर्कर, शालेय पोषण आहार कामगार बांधकाम काम गार नगरपरिषद कंत्राटी कामगार यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती निदर्शनाच्या वेळी कामगारांनी जोरदार घोषणाबाजी करत श्रम संहिता रद्द करा, जन सुरक्षा विधेयक मागे घ्या, कामगारांना किम ान वेतन त्वरित द्या,लाल बावटा जिंदाबाद अशा घोषणा दिल्या व यावेळी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. त्या निवेदनात म्हटले की,कामगार विरोधी चार श्रम संहिता व महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात आणि संघटित, असंघटित कामगारांच्या कायम काम, किमान वेतन, सामाजिक सुरक्षा व अन्य मूलभूत सुविधा पासून कामगार वंचित असल्याचे सांगत विविध म ागण्या करण्यात आल्या. यात प्रामुख्याने कार्पोरेट धार्जिन्या, कामगार विरोधी चार श्रमसंहिता मागे घेऊन कामगारांच्या बाजूचे कायदे करा व त्यांची कडक अंमलबजावणी करा., अंगणवाडी कर्मचारी, आशा व गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कामगार यांचे थकित मानधन त्वरित अदा करा. महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक त्वरित मागे घ्या.
४) समान व एकसारख्या कामासाठी कंत्राटी कामगारांना नियमित कामगारासारखे वेतन व इतर लाभ द्या., राष्ट्रीय नवीन शैक्षणिक धोरण मागे घ्या. आदी मागण्यांचा समावेश आहे.